PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dhagedore
Year: 2012

Song: Vedapisa Jhalo
Lyricist: Sandeep Khare

तरल शामल सजल हवा ही
एक अनामिक हूरहूर का ही
तरल शामल सजल हवा ही
एक अनामिक हूरहूर का ही
आणि अशातून तू ही दिसता
सहज पळभर लाजून हसता
हसलो भिरभिरलो आता कसा
वेडापिसा झालो वेडापिसा झालो
वेडापिसा झालो वेडापिसा आंहा...

भय असे अनिवार विजांचे
निखळ अविरत गडद घनांचे
आणि अशातून तू ही दिसता
सहज पळभर पाहून हसता
रमला जीव रमला आता कसा

वेडापिसा झाला वेडापिसा
जीव हा वेडापिसा
झाला वेडापिसा
जीव हा वेडापिसा

नाही मजला नाही मनाला
ठाऊक नव्हते काही कुणाला
नाही मजला नाही मनाला
ठाऊक नव्हते काही कुणाला
हो ज्याची होती केवळ चाहूल
तेच अंगणी दिसले पाऊल
ठसला क्षण हसला रेंगाळला
वेडापिसा झालो वेडापिसा झालो
वेडापिसा झालो वेडापिसा आहा...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*